**ठळक बातम्या**

- तीन देशांच्या दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सायप्रसमधे दाखल

- इराण-इस्रायल संघर्ष चिघळला, दोन्ही देशांकडून क्षेपणास्त्र आणि हवाई हल्ले सुरू /इस्रायलनं लष्करी मोहिम थांबवली तर इस्रायलवरचे हल्ले थांबवण्याची इराणची घोषणा

- उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू, मृतांमध्ये यवतमाळच्या तिघांचा समावेश

- मावळमध्ये कुंडमळा इथं इंद्रायणी नदीवरचा पूल कोसळल्यानं काही पर्यटक बुडाले, दोन जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती

**आणि**

- डब्ल्यू टी टी कंटेन्डर स्कोप्जे टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात मानव ठक्कर आणि मानुश शहा पराभूत

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सकाळी सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले असून संध्याकाळी ते सायप्रसमध्ये पोहोचले. सायप्रसच्या लार्नाका आंतरराष्ट्रीय विमानतळावर अध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिड्स यांनी त्यांचं स्वागत केलं. यानंतर लेमेसोस इथं ते तिथल्या भारतीय वंशाच्या नागरिकांशी, विद्यार्थ्यांशी तसंच व्यावसायिकांसोबत संवाद साधणार आहेत. दोन्ही नेते सायप्रसमधल्या भारतीय वंशाच्या तसंच सायप्रसच्या उद्योजकांसोबत व्यावसायिक गोलमेज बैठकीत सहभागी होत आहेत.

व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, डिजिटल सहकार्य आणि प्रादेशिक सुरक्षा यासारख्या प्रमुख मुद्यांवर राष्ट्राध्यक्ष क्रिस्टोडौलिड्स यांच्याशी प्रधानमंत्री उद्या निकोसिया इथं द्विपक्षीय चर्चा करतील. व्यापक जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवरही दोन्ही नेते विचारांची देवाणघेवाण करणार आहेत.

या चर्चेनंतर निकोसिया टाउन हॉलला प्रधानमंत्री मोदी भेट देणार आहेत. त्यानंतर सायप्रसमध्ये संयुक्त राष्ट्रांतर्फे शांतता राखण्यात भारतानं बजावलेल्या ऐतिहासिक भूमिकेची आठवण करून देणारा एक दौरा संयुक्त राष्ट्रांच्या युद्धविराम रेषेवर आयोजित करण्यात आला आहे.

सायप्रस दौरा आटोपल्यावर प्रधानमंत्री जी-७ शिखर परिषदेसाठी कॅनडाला रवाना होतील.

<><><><>

इराण-इस्रायल संघर्ष आज तिसऱ्या दिवशी आणखी चिघळला असून दोन्ही देशांनी क्षेपणास्त्र हल्ले आणि हवाई हल्ले सुरू केले आहेत. या हल्ल्यांमधे इस्रायलमध्ये किमान १३, आणि इराणमध्ये ८० जणांचा मृत्यू झाला आहे. इस्रायलमध्ये जखमींची संख्या २०० पर्यंत पोहोचली आहे, तर ३५ लोक बेपत्ता असून ते ढिगाऱ्याखाली अडकल्याचे मानले जात आहे.

इस्रायली सैन्यानं गेल्या ४० तासांत इराणवर दीडशेपेक्षा जास्त हल्ले केले आहेत, त्यात संरक्षण मंत्रालयाचं मुख्यालय, तेल आगार आणि इराणच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित ठिकाणं लक्ष्य करण्यात आला. या हल्ल्यांमुळे जगातलं सर्वात मोठं असलेल्या इराणच्या साउथ पार्स गॅस फील्डवरचं उत्पादन अंशतः थांबलं आहे, त्यामुळे जगभरात तेलाचे दर वाढून व्यापक आर्थिक व्यत्यय येण्याची भीती निर्माण झाली आहे.

इस्रायली हल्ल्यांना सुरुवात झाल्यापासून इराणने किमान ८० लोकांचा मृत्यू आणि ३२० हून अधिक जखमी झाल्याची पुष्टी केली आहे.

<><><><>

इस्रायलनं आपल्या विरोधातली लष्करी मोहिम थांबवली तर इस्रायलवरचे हल्ले थांबवू अशी घोषणा इराणनं आज केली. इराणनं काल आणि आज इस्रायलवर हवाई हल्ले केले. यामध्ये किमान दहा जण दगावले तर जवळपास दोनशे जखमी झाले. आपली कृती स्वसंरक्षणासाठी असल्याचं इराणनं म्हटलं आहे.

दरम्यान, इस्रायलनं इराणच्या तेलसाठ्यावर केलेल्या हल्ल्याची इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराक्वची यांनी निंदा केली आहे. इस्रायलचं हे कृत्य इराण आणि अमेरिका

यांच्यातल्या अणूचर्चेत व्यत्यय आणण्यासाठी तसंच आंतरराष्ट्रीय कायद्यातली सीमा ओलांडणारं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

इस्रायलचे हल्ले हे इराणला अण्वस्त्रे विकसित करण्यापासून रोखण्यासाठी असल्याचं इस्रायलची भूमिका आहे.

<><><><>

देशभरातील नवोन्मेषक, संशोधक, शास्त्रज्ञ, अभ्यासक आणि संस्थांकरता नवोन्मेष सुलभता आणि संशोधन सुलभता वाढवण्यासाठी धोरणात्मक सुधारणा आज केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी जाहीर केल्या. आज नवी दिल्लीत घेतलेल्या वार्ताहर परिषदेत डॉ. सिंग म्हणाले की, अशा क्रांतिकारी निर्णयांमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे वैयक्तिक मार्गदर्शन आणि पाठिंबा नसता तर हे शक्य झालं नसतं. प्रमुख वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या नेतृत्वाखाली देशातल्या 13 भारतीय तंत्रज्ञान संस्था आणि विविध संशोधन संस्थांशी झालेल्या सखोल चर्चेनंतर या सुधारणा जाहीर करण्यात आल्या आहेत.

<><><><>

पुढच्या वर्षी ३१ मार्चपर्यंत भारत पूर्णपणे नक्षलवाद मुक्त होईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला आहे. लखनऊ इथे पोलीस कॉन्स्टेबल नियुक्तीपत्र वितरण समारंभात ते बोलत होते. एकेकाळी ११ राज्यांमध्ये पसरलेला नक्षलवाद आता फक्त तीन जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे, असंही शहा यावेळी म्हणाले. देशातल्या पोलीस दलाचं आधुनिकीकरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालं. उत्तर प्रदेशात त्याची सुरुवात २०१७मध्ये झाल्याचंही शहा यावेळी म्हणाले.

<><><><>

उत्तराखंडमध्ये केदारनाथ परिसरात असलेल्या गौरीकुंड खार्क या डोंगराळ भागात आज सकाळी खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर झाडाला धडकून झालेल्या अपघाताची चौकशी 'एएआयबी' अर्थात, 'विमान अपघात तपास विभाग' करणार आहे. सहा यात्रेकरू आणि पायलटसह सात जणांचा या अपघातात मृत्यू झाला. यामध्ये यवतमाळच्या वणी इथल्या जयस्वाल कुटुंबातल्या तीन जणांचा समावेश आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

या घटनेनंतर, धामी यांनी एक उच्चस्तरीय बैठक बोलावली, ज्यामध्ये नागरी विमान वाहतूक सचिव, 'डीजीसीए' अर्थात, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचे प्रतिनिधी आणि संबंधित पथकं उपस्थित होते. सुरक्षेच्या कारणास्तव या प्रदेशातल्या सर्व खासगी आणि शटल हेलिकॉप्टर सेवा उद्यापर्यंत स्थगित करायचा निर्णय या बैठकीत घेतला गेला.

'एसडीआरएफ', अर्थात, 'राज्य आपत्ती निवारण दला'नं दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त हेलिकॉप्टर पूर्णपणे जळलं असून सर्व मृतदेह बाहेर काढले आहेत.

<><><><>

पुण्यातील मावळमध्ये कुंडमळा इथं इंद्रायणी नदीवरचा पूल कोसळल्यानं काही पर्यटक बुडाल्याचं वृत्त असून दोघांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पुणे आणि पीएमआरडीए अग्निशमन दल, तळेगाव दाभाडे पोलीस दलासह राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची दोन पथकंही दाखल असून बचाव कार्य सुरू आहे. आता पर्यन्त ३८ पर्यटकांना वाचवण्यात आलं आहे. मावळ मधील कुंडमळा हे पर्यटनस्थळ आहे. आज रविवारचा सुट्टीचा दिवस असल्याने अनेक पर्यटक त्या ठिकाणी गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. या दुर्घटनेमागील कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणार असल्याचं पवार यांनी म्हटलं आहे.

<><><><>

अहमदाबाद विमान अपघातातल्या ३२ मृतदेहांचे डीएनए नमुने जुळले असून आतापर्यंत १४ मृतदेह कुटुंबांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. मृतांपैकी ४ अहमदाबादचे, २ वडोदरा, १ खेडा, १ अरवली, १ बोटाड, ४ मेहसाणा आणि १ उदयपूरचा आहे. प्रत्येक मृताच्या कुटुंबासाठी एक विशेष पथक नियुक्त करण्यात आलं असून त्यात एक वरिष्ठ अधिकारी, एक पोलीस कर्मचारी आणि एक समुपदेशक यांचा समावेश आहे, अशी माहिती अहमदाबादच्या सरकारी रुग्णालयाचे अतिरिक्त अधीक्षक डॉ. रजनीश पटेल यांनी दिली आहे. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचे डीएनए जुळल्याची माहिती राज्याचे गृहमंत्री हर्ष संघवी यांनी दिली आहे.

<><><><>

उत्तर मॅसेडोनिया इथं झालेल्या डब्ल्यू टी टी कंटेन्डर स्कोप्जे टेबल टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात मानव ठक्कर आणि मानुश शहा या भारतीय जोडीला पराभव पत्करावा लागला. दक्षिण कोरियाच्या दुसऱ्या मानांकित लिम जोंघून आणि ओ जुनसंग या जोडीनं त्यांना सलग तीन सेटमध्ये ९-११, ७-११, ९-११ असे पराभूत केले.

**<><><><>**

देशाच्या पश्चिम किनारपट्टीवर जोरदार ते अति जोरदार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. कोकण, गोवा आणि कर्नाटक राज्याची किनारपट्टी याठिकाणी जोरदार ते अति जोरदार पाऊस सुरु आहे. येत्या दोन दिवसात दिल्ली, पंजाब, हरियाणा आणि गुजरातमध्ये वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल, अशी माहिती भारतीय हवामान विभागाचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. आर के जेनामणी यांनी आकाशवाणीशी बोलताना दिली. वायव्य भारतात विशेषतः दिल्लीच्या कमाल तापमानात मोठ्याप्रमाणात घट झाली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

एसटी बसनं प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उद्यापासून एसटी महामंडळ "एसटी पास थेट तुमच्या शाळेत" ही विशेष मोहीम राबवणार आहे. या मोहिमेतून विद्यार्थ्यांना एसटीचे पास त्यांच्या शिक्षणसंस्थांमधून वितरीत केले जाणार आहेत. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला तसे निर्देश दिले आहेत. त्यासाठी सर्व शाळा महाविद्यालयांनी आपल्या संस्थेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवावी अशी सूचना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी शिक्षणसंस्थांना केली आहे.

**//<><><><>//**